महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६

(दिनांक २१ जानेवारी, २०१४ पर्यंत सुधारलेला)

# Maharashtra Act No. XX of 1987

# The Maharashtra Local Authority Members' Disqualification Act, 1986

(*As modified upto the 21st January 2014*)

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

**२०१५**

**[किंमत :** रुपये ११ **]**

**१९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०**

# महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६

**अनुक्रमणिका**


**उद्देशिका**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. पक्षांतराच्या कारणावरून अनर्ह होणे.

३-क. लाभकारी राजकीय पदावरील नियुक्तीकरिता अनर्हता.

४. [वगळण्यात आले.]

५. पक्षांतराच्या कारणावरून झालेली अनर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत लागू न करणे.

६. फूट पडल्यानंतर किंवा विलीनीकरणानंतर पालिका सदस्य किंवा सदस्य पद सोडतील किंवा पद धारण करणार नाहीत.

७. पक्षांतराच्या कारणावरून अनर्ह ठरविण्यासंबंधीच्या प्रश्नाबाबत निर्णय.

८. दिवाणी न्यायालये, इत्यादींच्या अधिकारितेस आडकाठी.

९. नियम.

१०. अधिनियमास अधिभावी परिणाम असेल, परंतु, तो विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कायद्यांव्यतिरिक्त असेल.

११. विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

अनुसूची.

## सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०[१].

## [महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६]

(या अधिनियमास दिनांक २८ जुलै, १९८७ रोजी राज्यपाल यांची संमती मिळाली आणि तो **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चार, असाधारण, दिनांक २९ जुलै, १९८७ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.)

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, द्वारे सुधारित (दिनांक २९ एप्रिल, १९९६)†

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, द्वारे सुधारित (दिनांक १९ ऑक्टोबर २००६)†*

**पक्षांतराच्या कारणावरून विवक्षित स्थानिक प्राधिकरणांच्या सदस्यांच्या अनर्हतेबाबत आणि त्यांच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पक्षांतराच्या कारणावरून विवक्षित स्थानिक प्राधिकरणांच्या सदस्यांच्या अनर्हतेबाबत आणि त्यांच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ ', असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा [२]दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " आघाडी " किंवा " फ्रंट " याचा अर्थ, एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीसाठी उमेदवार उभे करण्याच्या प्रयोजनाकरिता स्वतःचा पक्ष तयार करणाऱ्या व्यक्तींचा गट, असा आहे ;

(ख) " जिल्हाधिकारी " याचा अर्थ, एखाद्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, असा आहे ;

१९६६ चा महा. ६१.

(ग) " आयुक्त " याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ६ अन्वये नियुक्त करण्यात आलेला एखाद्या महसूल विभागाचा आयुक्त, असा आहे ;

---

[१] उद्देश व कारणे याचे निवेदन यासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९८७, असाधाराण, भाग पाच, पृष्ठ ५८५ पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[२] दिनांक १ नोव्हेंबर, १९८७ (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०८६/सीआर-८७५/०४, दिनांक २९ ऑक्टोबर १९८७ पहा).

†* सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५०, कलम ६ द्वारे, २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

(घ) " सभासद " याचा अर्थ, महानगरपालिकेचा किंवा नगरपरिषदेचा किंवा जिल्हा परिषदेचा सभासद, असा आहे ;

(ङ) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ,—

(एक) महानगरपालिका,

(दोन) नगरपरिषद,

(तीन) जिल्हा परिषद, किंवा

(चार) पंचायत समिती.

असा आहे ;

(च) " सदस्य " याचा अर्थ, पंचायत समितीचा सदस्य, असा आहे ;

(छ) " महानगरपालिका " याचा अर्थ, संबंधित महानगरपालिका कायद्यान्वये घटित केलेली महानगरपालिका, असा आहे ;

(ज) " नगर परिषद " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ * अन्वये घटित केलेली नगर परिषद, असा आहे ; १९६५ चा महा. ६१.

(झ) कलम ३ च्या स्पष्टीकरणानुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटचा सदस्याच्या संबंधात, " नगरपालिका पक्ष " याचा अर्थ,—

(एक) महानगरपालिकेच्या सदस्यांच्या बाबतीत, उक्त स्पष्टीकरणानुसार त्या त्या वेळी, त्या राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्य असलेल्या महानगरपालिकाच्या सर्व सदस्यांचा समावेश असलेला गट, असा आहे ;

(दोन) नगरपरिषदेच्या सभासदाच्या बाबतीत, उक्त स्पष्टीकरणानुसार त्या त्या वेळी त्या राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्य असलेल्या नगर परिषदेच्या सर्व सदस्यांचा गट, असा आहे.

(ञ) सभासदाच्या किंवा सदस्यांच्या बाबतीत, " मूळ राजकीय पक्ष ", याचा अर्थ, कलम ३, पोट-कलम (१) च्या प्रयोजनाकरिता तो ज्या राजकीय पक्षाचा सदस्य आहे असा राजकीय पक्ष, असा आहे ;

(ट) " पंचायत समिती ", याचा अर्थ ' महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ' अन्वये घटित केलेली पंचायत समिती, असा आहे ; १९६२ चा महा. ५.

(ठ) कलम ३ च्या स्पष्टीकरणानुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्याच्या बाबतीत, " पंचायत समिती पक्ष ", याचा अर्थ, उक्त स्पष्टीकरणानुसार त्या राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या त्या त्या वेळी सदस्य असणाऱ्या, पंचायत समितीच्या सर्व सभासदांचा अंतर्भाव असलेला गट, असा आहे ;

---

* आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ पहा.

(ड) " संबंधित नगरपालिका कायदा ", याचा अर्थ,—

१८८८ चा मुंबई तीन. (एक) बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेच्या बाबतीत, ** मुंबई महानगरपालिका अधिनियम, असा आहे.

१९५० चा मध्य प्रांत वऱ्हाड दोन. (दोन) नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ असा आहे.

१९४९ चा मुंबई ५९. (तीन) इतर कोणत्याही शहराच्या महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ असा आहे.

(ढ) " अनुसूची ", याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे ;

१९६२ चा महा. ५. (ण) " जिल्हा परिषद ", याचा अर्थ, ' महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ' अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद, असा आहे ;

(त) कलम ३ च्या स्पष्टीकरणानुसार कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्य असणाऱ्या, जिल्हा परिषद सदस्यांच्या बाबतीत " जिल्हा परिषद पक्ष ", याचा अर्थ, उक्त स्पष्टीकरणानुसार त्या राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या त्या त्या वेळी सदस्य असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सर्व सदस्यांचा अंतर्भाव असलेला गट, असा आहे ;

**३.** (१) [१][ कलम ५ ] यांतील तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या असणाऱ्या सभासदाने किंवा सदस्याने,— पक्षांतराच्या कारणावरून अनर्ह होणे.

(क) जर असा राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिले असेल तर, किंवा

(ख) तो ज्या पक्षाचा सदस्य आहे त्या राजकीय पक्षाकडून किंवा आघाडीकडून किंवा फ्रंटकडून किंवा त्यांपैकी कुणाहीकडून या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अगर प्राधिकाऱ्यांकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांविरूद्ध जाऊन, जर दोन्ही बाबतीत अशा राजकीय पक्षाची किंवा आघाडीची किंवा फ्रंटची किंवा व्यक्तींची किंवा प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय, महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद किंवा, यथास्थिति, पंचायत समितीच्या कोणत्याही सभेत मतदान केले किंवा मतदान करण्याचे वर्जिले असेल तर आणि अशा मतदानापासून किंवा वर्जनापासून पंधरा दिवसांच्या आत, अशा राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने किंवा व्यक्तीने किंवा प्राधिकाऱ्याने असे मतदानाचे किंवा वर्जनाचे कृत्य क्षमापित केलेले नसेल तर, तो सभासद किंवा सदस्य राहण्यास अनर्ह होईल :—

१९६२ चा महाराष्ट्र ५. परंतु, कोणताही संबंधित नगरपालिका कायदा किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याखालील कोणतेही पद, प्राधिकरण किंवा समिती यांच्या निवडणुकीत असा पक्ष किंवा आघाडी किंवा फ्रंट यांची पूर्वपरवानगी न घेता, केलेले असे मतदान किंवा वर्जन या खंडाअन्वये क्षमापित केले जाणार नाही.

---

** आता मुंबई महानगरपालिका अधिनियम पहावा.

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. ५०, कलम २(क)(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,–

(क) सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून निवडून आलेली व्यक्ती ही, तिला कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने अशा सभासदाच्या किंवा सदस्याच्या निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे केलेले असल्यास, त्या राजकीय पक्षाची किंवा आघाडीची किंवा फ्रंटची असल्याचे मानले जाईल.

(ख) नामनिर्देशित [१][ सभासद ] हा,—

(एक) त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकास तो एखाद्या राजकीय पक्षाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा सदस्य असल्यास [२][ * * * ] तो त्या राजकीय पक्षाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा सदस्य असल्याचे मानले जाईल.

(दोन) कोणत्याही अन्य प्रकरणामध्ये, [३][ तो ज्या दिनांकापासून नामनिर्देशित झाला असेल ] त्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी तो, ज्या राजकीय पक्षाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा सदस्य, किंवा यथास्थिति, प्रथम सदस्य झाला असेल त्या पक्षाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा तो सदस्य असल्याचे समजले जाईल.

[४][ * * * ]

(२) कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने उभ्या केलेल्या उमेदवारा-व्यतिरिक्त, अन्य प्रकारे निवडून दिलेला सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य हा, त्याने अशा निवडणुकीनंतर कोणत्याही राजकीय पक्षात किंवा आघाडीत किंवा फ्रंटमध्ये प्रवेश केला तर, सभासद असण्यास, किंवा यथास्थिति, सदस्य असण्यास अनर्ह ठरविला जाईल.

[५][ * * * ]

(४) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या प्रारंभी सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य आहे अशी व्यक्ती (मग ती सभासद म्हणून किंवा सदस्य म्हणून निवडून दिलेली किंवा नामनिर्देशित केलेली [६][ * * * ] व्यक्ती असो.)—

(क) अशा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राजकीय पक्षाची किंवा आघाडीची किंवा फ्रंटची सदस्य असेल त्याबाबतीत, पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, अशा राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने उभा केलेला उमेदवार हा, सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून निवडून देण्यात आला असल्याचे समजण्यात येईल ;

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने उभ्या केलेल्या उमेदवाराव्यतिरिक्त अन्य प्रकारे निवडून दिलेला सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य असल्याचे समजण्यात येईल. [७][ * * * ]

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (क) (२)(अ)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(क) २(अ)(दोन) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(क) (२)(तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(ख) द्वारे खंड (ग) वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २, खंड (ख) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या, कलम २(ग) (१) द्वारे, मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या, कलम २(ग) (२) द्वारे, मजकूर वगळण्यात आला.

[१][" **३क.** कोणत्याही राजकीय पक्षाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असलेला सभासद किंवा, यथास्थिति, सदस्य, जो कलम ३ अन्वये सभासद किंवा, यथास्थिति, सदस्य असण्यास अनर्ह ठरला असेल, तो, त्याच्या अनर्हतेच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि असा सभासद किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून त्याचा पदावधी समाप्त झाला असता तो दिनांक ; किंवा ज्या दिनांकास तो एखाद्या स्थानिक प्राधिकरणाची निवडणूक लढवील व तो निवडून आल्याचे जाहीर होईल तो दिनांक, यांपैकी जो आधीचा असेल अशा दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता, कोणतेही लाभकारी राजकीय पद धारण करण्यासदेखील अनर्ह होईल.

लाभकारी राजकीय पदावरील नियुक्तीकरिता अनर्हता.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, " लाभकारी राजकीय पद " या शब्दप्रयोगाचा अर्थ, ज्या पदास देण्यात येणारे वेतन किंवा पारिश्रमिक हे पूरक स्वरूपाचे असेल त्या पदाव्यतिरिक्त असणारे,—

(एक) राज्य शासनाच्या सरकारी महसुलातून किंवा राज्याच्या एकत्रित निधीतून ज्या पदास वेतन किंवा पारिश्रमिक देण्यात येते असे राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कोणतेही पद ; किंवा

(दोन) राज्य शासनाच्या संपूर्णतः किंवा अंशतः मालकीच्या असलेल्या एखाद्या मंडळातील मग ते मंडळ विधिसंस्थापित असो वा नसो–ज्या पदास त्या मंडळाकडून वेतन किंवा पारिश्रमिक देण्यात येते असे कोणतेही पद ; किंवा

(तीन) स्थानिक प्राधिकरणाकडून त्या स्थानिक प्राधिकरणाच्या निधीतून ज्या पदास वेतन किंवा पारिश्रमिक देण्यात येते असे एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचे, कोणतेही पद, असा आहे.".]

[२][ * * * ]

**५.** (१) सभासदाचा किंवा सदस्याचा मूळ राजकीय पक्ष किंवा आघाडी किंवा फ्रंट दुसऱ्या राजकीय पक्षात किंवा आघाडीत किंवा फ्रंट यात विलीन झाला असेल त्याबाबतीत, आणि तो व त्याच्या मूळ राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे इतर अन्य सदस्य हे,—

पक्षांतराच्या कारणावरून झालेली अनर्हता विलीनीकरणाच्या बाबतीत लागू न करणे.

(क) अशा इतर राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे, किंवा यथास्थिति, अशा विलीनीकरणाने तयार झालेल्या नवीन राजकीय पक्षाचे सदस्य बनले आहेत ; किंवा

(ख) त्यांनी विलीनीकरण स्वीकारले नाही आणि स्वतंत्र गट म्हणून काम करण्याची तयारी दर्शवलेली आहे, असा त्याने दावा केला असेल त्याबाबतीत, आणि अशा विलीनीकरणाच्या वेळेपासून, यथास्थिति, असा इतर राजकीय पक्ष, किंवा नवीन राजकीय पक्ष किंवा आघाडी किंवा फ्रंट किंवा गट हा, कलम ३, पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, तो सभासद किंवा सदस्य ज्या राजकीय पक्षाचा किंवा आघाडीचा किंवा फ्रंटचा (सदस्य) आहे असा पक्ष राजकीय पक्ष किंवा फ्रंट असल्याचे समजण्यात येईल आणि या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, तो त्याचा मूळ राजकीय पक्ष किंवा आघाडी किंवा फ्रंट असल्याचे समजण्यात येईल.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ द्वारे, कलम ३ नंतर ३क समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, कलम ४ वगळण्यात आले.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, सभासदाच्या, किंवा यथास्थिति, सदस्याच्या मूळ राजकीय पक्षाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे विलीनीकरण हे, जर संबंधित नगरपालिका पक्षाच्या, जिल्हा परिषद पक्षाच्या, किंवा यथास्थिति, पंचायत समिती पक्षाच्या दोन-तृतीयांशाहून कमी नाही इतक्या सदस्यांनी अशा विलीनीकरणास संमती दिलेली असेल तरच केवळ असे विलीनीकरण झाले असल्याचे समजण्यात येईल.

[३][ विलीनीकरणानंतर सभासद किंवा सदस्य पद सोडतील किंवा पद धारण करणार नाहीत.

**६.** (१) [१][कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या विलीनीकरणाबाबत] दावा सांगणारा सभासद, किंवा यथास्थिति, सदस्य,—

(क) जर संबद्ध नगरपालिका कायदा, किंवा यथास्थिति, ' महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ' अन्वये असा सभासद किंवा सदस्य याव्यतिरिक्त अन्य कोणतेही पद धारण करीत असेल तर, या [२][***] विलीनीकरणाच्या दिनांकास असे पद रिक्त असल्याचे मानले जाईल आणि त्या दिनांकास व त्या दिनांकापासून तो असे पद धारण करण्याचे बंद करेल ; १९६२ चा महा. ५

[४][ * * * *]

पक्षांतराच्या कारणावरून अनर्ह ठरविण्या-संबंधीच्या प्रश्नाबाबत निर्णय.

**७.** जर या अधिनियमान्वये,—

(क) महानगरपालिकेचा सभासद ; किंवा

(ख) नगरपालिकेचा सभासद ; किंवा

(ग) जिल्हा परिषदेचा सभासद ; किंवा

(घ) पंचायत समितीचा सदस्य,

हा, या अधिनियमान्वये, अनर्ह झालेला आहे किंवा कसे याबाबतीत जर कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो प्रश्न,—

(एक) महानगरपालिकेच्या सभासदाच्या संबंधात आयुक्तांकडे, आणि

(दोन) कोणत्याही इतर सभासद किंवा सदस्यांच्या संबंधात जिल्हाधिकाऱ्याकडे ; पाठविण्यात येईल आणि आयुक्ताचा, किंवा यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय हा अंतिम असेल.

दिवाणी न्यायालये, इत्यादींच्या अधिकारितेस आडकाठी.

**८.** कोणत्याही संबद्ध नगरपालिका कायद्यात किंवा *' महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५' किंवा ' महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ' यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यासाठी आयुक्ताला किंवा जिल्हाधिकाऱ्याला, कलम ७ अन्वये कार्यवाही करण्याचा किंवा निर्णय देण्याचा अधिकार प्रदान केलेला आहे अशा, पक्षांतराच्या कारणावरून सभासदाला किंवा सदस्याला अनर्ह ठरविण्याच्या कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही बाबीबाबत कार्यवाही करण्याची अथवा निर्णय देण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास व इतर प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास असणार नाही ; आणि या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारानुसार आयुक्ताने किंवा जिल्हाधिकाऱ्याने, केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात, कोणत्याही दिवाणी न्यायालयास किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास निषेधाज्ञा देता येणार नाही. १९६५ चा महाराष्ट्र ४०. १९६२ चा महाराष्ट्र ५.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५०, कलम ५(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

* आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ पहावा.

**९.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी अशा नियमांत तरतूद करता येईल :—

(क) ज्या राजकीय पक्षाचे, आघाडीते किंवा फ्रंटचे निरनिराळे सभासद, किंवा यथास्थिति सदस्य आहेत त्या राजकीय पक्षाच्या आघाडीच्या किंवा फ्रंटच्या जर कोणत्या नोंदवह्या असल्यास, त्या नोंदवह्या किंवा इतर अभिलेख ठेवणे ;

(ख) सभासदाच्या संबंधात नगरपालिका पक्षाचा किंवा जिल्हा परिषद पक्षाचा नेता आणि सदस्यांच्या संबंधात पंचायत समिती पक्षाचा नेता, अशा सभासदच्या, किंवा यथास्थिति, सदस्याच्या संबंधात कलम ३, पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपातील कोणत्याही क्षमापनाच्या संबंधात सादर करील तो अहवाल आणि, ज्या कालावधीत आणि ज्या प्राधिकरणाला असा अहवाल सादर करण्यात येईल तो कालावधी व ते प्राधिकरण ;

(ग) कोणत्याही सभासदाच्या किंवा सदस्याच्या राजकीय पक्षातील किंवा आघाडीतील किंवा फ्रंटमधील प्रवेशासंबंधीचे जे अहवाल राजकीय पक्ष किंवा आघाडी किंवा फ्रंट सादर करील ते अहवाल आणि असे अहवाल ज्या अधिकाऱ्याला सादर करण्यात येतील असा, महानगरपालिकेचा, नगरपालिकेचा, जिल्हा परिषदेचा, किंवा यथास्थिति पंचायत समितीचा अधिकारी ;

(घ) कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रश्नावर निर्णय देण्याची कार्यपद्धती तसेच अशा प्रश्नावर निर्णय देण्याच्या प्रयोजनार्थ करण्यात येईल अशा कोणत्याही चौकशीची कार्यपद्धती ; आणि

(ङ) विहित करणे आवश्यक आहे किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमान्वये नियम करताना, राज्य शासनास अशी तरतूद करता येईल की, या नियमांचे उल्लंघन केल्यास, दोष सिद्ध झाल्यानंतर अपराध्यास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि या पहिल्या उल्लंघनानंतरही उल्लंघन करण्याचे त्याने चालू ठेवल्यास पहिले उल्लंघन केल्याचा दोष सिद्ध झाल्यानंतर ज्या कालावधीत उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसासाठी पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीन दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहाचे मतैक्य होईल किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल तेव्हा, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्यावर तो नियम, यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अधिनियमास अधिभावी परिणाम असेल. परंतु तो विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कायद्यांव्यतिरिक्त असेल.

**१०.** (१) या अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदी, त्याविरूद्ध त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी अंमलात येतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून. या अधिनियमाच्या तरतुदी महानगरपालिका नगरपालिका किंवा इतर संबंधित स्थानिक प्राधिकरण यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्याव्यतिरिक्त जादा तरतुदी असतील, आणि यात यापूर्वी स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल तेवढी बाब खेरीजकरून इतर बाबतीत, त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका किंवा इतर संबंधित स्थानिक प्राधिकरण यांच्या संबंधातील तरतुदी कमी होणार नाहीत.

(३) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, *" महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ * याच्या अनुसूची एक च्या भाग दोन किंवा भाग तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नगरपालिका क्षेत्रासाठी नगरपालिकेचा सभासद म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास किंवा शासकीय कर्मचारी असल्यामुळे पंचायत समितीचा सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या व सहकारी संस्थेचा प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. १९६५ चा महाराष्ट्र ४०.

विवक्षित अधिनियमाची सुधारणा.

**११.** अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने व त्या मर्यादेपर्यंत याद्वारे सुधारण्यात आले आहेत.

## अनुसूची

(कलम ११ पहा)

| अनु-क्रमांक (१) | अधिनियमाचे संक्षिप्त नाव व क्रमांक (२) | सुधारणा (३) | |
|---|---|---|---|
| १ | **मुंबई महानगरपालिका अधिनियम (१९८८ चा मुंबई ३) | कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— "(१क) महापालिका सदस्य म्हणून पद धारण करतांना एखाद्या व्यक्तीस त्या पदावधीत ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६ ' अन्वये महापालिका सदस्य असण्यास अनर्ह ठरविण्यात आल्यास ती व्यक्ती असा महापालिका सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल. " | १९८७ चा महाराष्ट्र २०. |
| २ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९). | कलम १० मध्ये, पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— "(१क) कोणतीही व्यक्ती आपल्या पदावधीत कोणत्याही वेळी ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६ ' अन्वये पालिका सदस्य होण्याला अनर्ह ठरली असेल तर ती पालिका सदस्य होण्यास अनर्ह ठरेल. " | १९८७ चा महाराष्ट्र २०. |

* आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ पहावा.

** आता मुंबई महानगरपालिका अधिनियम पहावा.

**अनुसूची—**समाप्त.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३ | नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २). | कलम १ मध्ये,—<br>(१) " निवडून आल्यानंतर " या मजकुरानंतर " किंवा नामनिर्देशित केल्यानंतर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.<br>(२) खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—<br>" (क-एक) ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६ ' अन्वये पालिका सदस्य असण्यास अनर्ह ठरविण्यात आले आहे. किंवा ".<br>१९८७ चा महाराष्ट्र २०. |
| ४ | **महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र ४०). | कलम १६ मध्ये,–<br>(१) पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—<br>"(१क) एखाद्या व्यक्तीस तिच्या पदावधीत ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६ ' अन्वये पालिका सदस्य असण्यास अनर्ह ठरविण्यात आले असल्यास ती असा पालिका सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल. ".<br>(२) पोट-कलम (२) मध्ये, " पोट-कलम (१) " नंतर " किंवा पोट-कलम (१क) मधील " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |
| ५ | महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५). | कलम १६ मध्ये,–<br>(१) पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—<br>"(१क) एखाद्या व्यक्तीस तिच्या पदावधीत ' महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता अधिनियम, १९८६ ' अन्वये पालिका सदस्य असण्यास अनर्ह ठरविण्यात आले असता, ती असा पालिका सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल. ".<br>१९८७ चा महाराष्ट्र २०. |

** आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ पहावा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई